# डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,अकोला

वाचा: १. शासन निर्णय क्र. वित्त विभाग क्रमांक : सेनिवे-२०१९/प्र.क्र.५८/सेवा-४, दि. ०१.०३.२०१९.
२. शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक : सेनिवे-२०२२/प्र.क्र.८५/सेवा-४, दि. १०.१०.२०२४.

## प रि प त्र क

क्र.बीजीए/पेन्शन/११/२०२४. दिनांक: १७ डिसेंबर,२०२४.

या विद्यापीठातील सर्व नियंत्रण अधिकारी/कार्यालय प्रमुख/आहरण व संवितरण अधिकारी यांना कळविण्यात येते की,

कृषि विद्यापीठामधील निवृत्तीवेतनधारक/कुटुंबनिवृत्तीवेतनधारकांना संदर्भ क्र. १ दि. ०१.०३.२०१९ नुसार दि. ०१.०१.२०१६ नंतर सेवानिवृत्त झालेल्या व होणाऱ्या तसेच मृत पावलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांसाठी सेवानिवृत्तीउपदान/मृत्यु-नि-सेवानिवृत्तीउपदानाची कमाल मर्यादा रू. १४,००,०००/- करण्यात आली होती.

आता संदर्भ क्र. २ दि. १०.१०.२०२४ च्या शासन निर्णयाद्वारे दि. ०१.०९.२०२४ पासुन सेंवानिवृत्तीउपदान/मृत्यु-नि-सेवानिवृत्तीउपदानाची कमाल मर्यादा रू. १४ लक्ष वरून रू. २० लक्ष करण्यात येत आहे.

परीणामी शासन निर्णयातील मार्गदर्शक सुचनेप्रमाणे कृषिविद्यापीठामधील आणि संलग्नित व अनुदानित कृषि महाविद्यालयामधील दि. ०१.०९.२०२४ नंतर सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांचे सेवानिवृत्तीउपदान/मृत्यु-नि-सेवानिवृत्ती उपदानाबाबत संदर्भ क्र. २ चे शासन निर्णयाचे अनुषंगाने कार्यवाही करण्यात यावी.

सदर परिपत्रक विद्यापीठाचे अर्थ प्रशासन विभाग, यांचे सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

मा.कुलगुरू यांचे मंजुरी व आदेशान्वये.

स्वाक्षरीत/-
कुलसचिव
डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला.

प्रत:- माहिती व योग्य कार्यवाहीकरिता रवाना.

१) नियंत्रक, डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला.

२) नियंत्रक अधिकारी,(सर्व)------------------------------------------------------------------------

३) कार्यालय प्रमुख सर्व ------------------------------------------------------------------------

४) अधिदान व लेखाधिकारी, डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला/नागपूर.

५) प्रभारी अधिकारी, संगणक विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला.

उपकुलसचिव(आस्था)
डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला.